प्रकरण ४ थे

# विठ्ठल रामजी शिंदे

१ ) प्रारंभिक जीवन

२ ) सामाजिक कार्य

## १ ) प्रारंभिक जीवन :-

**लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते,** 'गेल्या १५० वर्षांत भारतीय इतिहासात दलितसेवेला व उच्च आध्यात्मिक संस्कृतीच्या प्रसाराला जन्मभर वाहून घेतलेल्या समाजसुधारकांमध्ये वि.रा. शिंदेंचे स्थान श्रेष्ठ आहे.' **मुंबई प्रांताचे शिक्षणमंत्री रँगलर परांजपे यांच्या मते,** 'भारतात जेव्हा सामाजिक कामगिरीचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्या इतिहासात वि.रा. शिंदे यांनी फार उच्च व मानाचे स्थान इतिहासकार देतील.' गांधीयुगाच्या आधी सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार करणारे विचारवंत म्हणून ते ओळखले जातात. कर्मवीर शिंदे हे गौतम बुद्धाच्या परंपरेतील एक मोठे सुधारक होते. विशेषत: अस्पृश्यता निवारणाच्या कामी त्यांचे कार्य महत्त्वाचे होते.

**जीवनपट :-** वि.रा. शिंदे यांची बाह्य वैशिष्ट्ये - धिप्पाड देहयष्टी, भरदार छाती, विद्वत्तेचे तेज, चेहऱ्यावर शांत भाव, पांढरी दाढी व केस ऋषिमुनीसारखे दिसत. जन्म २३ एप्रिल १८७३ जमखिंडी संस्थान (विजापूर जिल्हा) येथे झाला. या संस्थानात शिक्षण मोफत असे. ते १८ व्या वर्षी मॅट्रिक पास झाले. ते बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांनी वि. रा. शिंदे यांना २५ रु. स्कॉलरशिप सुरू केली. त्यासाठी त्यांनी शिक्षण संपल्यावर बडोदा संस्थानात नोकरी करण्याची अट होती. इ.स. १८९८ मध्ये वि. रा. शिंदे बी. ए. प्रथम श्रेणीत पास झाले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलजेमध्ये त्यांनी शिक्षण घेतले होते. घरची गरिबी होती. मराठी, संस्कृत, इंग्रजीचा अभ्यास केला. वडील विठ्ठलभक्त होते.

वि. रा. शिंदे यांच्या आई-वडिलांना २० अपत्ये झाली. ५ जगली. त्यांना १ भाऊ ३ बहिणी होत्या. जनाक्का, तन्याक्का आणि चंद्राक्का ही त्यांची बहिणीची नावे. त्यापैकी फक्त जनाक्कांनी सार्वजनिक जीवनामध्ये योगदान दिले. शिंदे यांचे घराणे मुळात श्रीमंत होते. पण त्यांचे आई-वडील साधु बैराग्यांच्या नांदी लागले. कामधंदा सोडून दिला. त्यामुळे हे घराणे गरिबीत लोटल्या गेले.

आई-वडीलांच्या संस्कारामुळे आपल्या अनेक गुणांची जोपासना झाली. यासंबंधी वि. रा. म्हणतात, ''माझ्या घरी आई वडिलांनी जे संस्कार माझ्यावर घडविले तेथेच माझ्या कार्याचा योग्य प्रकारे पाया घातला गेला, म्हणूनच यावर उभी असलेली इमारत टिकू शकली.'' विद्यार्थी असताना पुस्तकासाठी पैसे नसत. मित्रांच्या पुस्तकांवरच त्यांना भागवावे

लागे, फीस भरण्यासाठी कधी कधी पैसे नसत. त्यांचे शिक्षण चालू असताना दारिद्र्याने त्यांची चांगली परीक्षा घेतली. माणसे जोडण्याची व त्यांची सहानुभूती संपादन करण्याची सवय त्यांना शालेय जीवनातच लागली होती. वि. रा. शिंदे यांनी लिहिलेली रोजनिशी अनेक अंगानी अभ्यासण्यासारखी आहे. आगरकरांच्या सुधारक पत्रातील विचारांचा आगरकरांवर प्रभाव पडला होता. त्यांना गरीबाबद्दल जी आपुलकी, जिव्हाळा वाटत राहिला त्याची बीजे त्यांच्या घरातील दारिद्र्य व गरीबी यातच दिसतात. कर्मवीर शिंदे यांनी श्री. त्रिंबकराव खांडेकर या ब्राह्मण शिक्षकाबद्दल व त्यांनी त्यांच्यावर केलेल्या संस्काराबद्दल चांगले उद्‌गार काढले आहेत. अस्पृश्यांना सामाजिक स्वातंत्र्य व समता दिल्याशिवाय देशाला भवितव्य नाही, असे त्यांचे ठाम मत होते.

डॉ. भांडारकर, सर चंदावरकर, छत्रपती शाहू महाराज, लोकमान्य टिळक यांच्याप्रमाणेच महात्मा गांधींशी त्यांचे मतभेद झाले. त्या वेळी तेथेही त्यांनी आपली मते प्रामाणिकपणे मांडली. २५/११/१९२४ रोजी महात्मा गांधींना त्यांनी पत्र लिहिले की, "तुम्ही देशासाठी तीन कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे. हा कार्यक्रम म्हणजे खादी, हिंदू-मुस्लीम ऐक्य व अस्पृश्यतानिवारण हा आहे. या तुमच्या तीन कलमी कार्यक्रमात अस्पृश्यतानिवारणाला 'तिसरे' स्थान दिले आहे. तेथे तुमचा क्रम चुकला आहे असे मला वाटते. या कार्यक्रमला खरोखर पहिले स्थान पाहिजे."

मॅट्रिकनंतर शिक्षक व कारकुनांची नोकरी केली. पुण्यात फर्ग्युसन कॉलेजातून बी.ए. केले. Deccan Maratha Education Association संस्थेतर्फे त्यांना दरमहा १० रु. ची मदत मिळे. ते प्रार्थना समाजाचे सदस्य होते.

**इ.स. १९०१-१९०३ :-** मुंबई प्रार्थना समाज व कोलकाता ब्राह्मो समाजातर्फे इंग्लंड येथील मँचेस्टर कॉलेजमध्ये धर्मशिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी ते गेले. वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीचे कार्य करण्याचा निर्णय भिंगार या अहमदनगरजवळच्या ठिकाणी अस्पृश्यांच्या सभेत हजर राहिल्यानंतर घेतला. १९०६ मध्ये All India Depressed Class Mission ची स्थापना केली. १९१० मध्ये आई-वडिलांचे निधन झाले.

**वि.रा. शिंदे यांच्यावर झालेले संस्कार - पडलेले प्रभाव :-**

१) आगरकरांच्या विचारांचा प्रभाव पडला होता.

२) J.S. Mill चा Liberty हा ग्रंथ - Subject of Women हा ग्रंथ, हर्बर्ट स्पेन्सरचे ग्रंथ Education, Introduction to the Study of Sociology या ग्रंथाचा प्रभाव होता.

३) मॅक्समुलरच्या तत्त्वज्ञानाचा परिचय झाल्याने ते धर्मश्रद्धेकडे वळले.

४) वारकरी संप्रदायाचा प्रभावही त्यांच्यावर होता. विशेष म्हणजे गरिबीचा संस्कार त्यांच्यावर झाल्याने त्यांचे विचारविश्व बदलले. चौफेर वाचन, निरीक्षण, चिंतन यातूनच एक प्रकारची प्रगल्भता त्यांना प्राप्त झाली होती. त्र्यंबकराव खांडेकर या ब्राह्मण शिक्षकाचाही त्यांच्यावर प्रभाव पडला होता.

**ग्रंथसंपदा :-**

१) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न (१९३३)

२) History of Parihars

३) माझ्या आठवणी व अनुभव (आत्मचरित्र)

४) भागवत धर्माचा विकास (वि.रा. शिंदे यांचे लेख)

५) मराठ्यांची पूर्वपीठिका (लेख)

६) कानडी-मराठी संबंध (लेख)

७) कोकणी-मराठी संबंध (लेख)

**सामाजिक कार्य :-**

**१) होळीच्या सणाविरुद्ध प्रचार :-** होळीच्या सणास आलेले हिडीस स्वरूप धर्माला अनुसरून नाही असे त्यांचे मत होते. शिव्या देणे, दारू पिणे, अंगाला शेण-राख लावणे यावर त्यांनी टीका केली. होळीच्या सणाविरुद्ध मोहीम काढणारा एक प्रचारक म्हणून ते प्रसिद्ध पावले. त्यासंदर्भात त्यांनी पुण्यात किर्लोस्कर थिएटरात एक सभा भरवली. त्यांनी यासंदर्भात केलेल्या जागृतीचा एक चांगला परिणाम झाला. होळीच्या सणास खेळण्याच्या स्पर्धा, भाषण स्पर्धा घ्याव्यात असे ते सुचवतात.

**२) गुन्हेगार जातीसंबंधीची मते -** गुन्हेगार जाती या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे, अज्ञानामुळे निर्माण होतात, उदा. (पारधी) असे त्यांचे मत होते. ब्रिटिशांकडे निवेदने दिली. पोलिस यंत्रणेला कल्पना दिली. २५ मे १९१६ रोजी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत 'गुन्हेगार जातीची सुधारणा' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले.

**३) मुरळी सोडण्याच्या प्रथेवर हल्ला :-** दक्षिण महाराष्ट्रात कनिष्ठ जातीत मुरळी, जोगतीण, भावीण, देवदासी ही प्रथा होती. देवाला सोडलेल्या मुलींचा शोध घेऊन त्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था केली. समाजकंटकांचा व प्रतिगाम्यांचा यास विरोध झाला. त्यांच्यावर हल्ला झाला. या विषयावर संशोधनपूर्ण लेख लिहिला. इ.स.१९११ मध्ये मुरळी प्रतिबंधक परिषद त्यांनी भरवली व ही प्रथा बंद करण्याचा पहिला प्रयत्न त्यांनी केला. या कार्यात बहीण जनाक्काची साथ त्यांना मिळाली.

**४) मराठा राष्ट्रीय संघाची स्थापना :-** ८ नोव्हेंबर १९१७ रोजी मराठा राष्ट्रीय संघ स्थापण्यामागे मराठा समाजात जागृती करणे हा हेतू होता. या संस्थेतर्फे पुण्यात त्यांचे जाहीर भाषण झाले. १०,००० लोक उपस्थित होते. मराठा समाज हा महाराष्ट्राच्या पाठीचा कणा असल्यामुळे त्यांना मराठा जागृती महत्त्वाची वाटे. राष्ट्रीय सभेला अनुकूल असे धोरण राबविले.

**५) दुष्काळग्रस्तांना मदत :-** इ.स.१९२० मध्ये पुणे व नगर जिल्ह्यात दुष्काळ पडला. याप्रसंगी मिशनच्या वतीने धान्य, शिजवलेले अन्न मोफत दिले जाई. दुष्काळग्रस्तांना मदत दिली जाई ही मदत पैशाच्या व कपड्याच्या स्वरूपातही दिली गेली. त्यामुळे हजारो गरिबांचे प्राण वाचले.

**६) ब्राह्मणेतर चळवळ व पक्षावर टीका :-** हा पक्ष इ.स.१९२० मध्ये स्थापन झाला होता. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हा राष्ट्रीय ऐक्याला घातक ठरेल असे त्यांचे मत होते. ब्राह्मणेतर पक्षाचे ध्येयधोरण व कार्यपद्धती यावर त्यांनी टीका केली होती. ब्राह्मणेतर चळवळीशी ते समरस होऊ शकले नाहीत. ब्राह्मणेतर चळवळीमुळे राष्ट्रीय चळवळ कमजोर होईल अशी भीती त्यांनी अनेकदा व्यक्त केली होती.

**७) वायकोम (केरळ) येथे अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह :-** (इ.स.१९२४) वायकोम येथील अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. ख्रिश्चन, मुस्लिम यांना प्रवेश होता पण अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. त्यासंदर्भात वि. रा. शिंदे यांनी सत्याग्रह केला होता.

**८) स्त्रियांच्या सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह :-** 'ज्ञानप्रकाश' यातून त्यांनी लेखमाला लिहिली. १९१९ मध्ये पुणे पालिकेने मुलांना सक्तीचे शिक्षण देण्याचा ठराव पास केला होता; पण त्या ठरावातून मुलींना वगळले हे त्यांना आवडले नाही. म्हणून त्यांनी पुणे पालिकेवर मोर्चा नेला. रमाबाई रानडे, भगिनी जनाक्का या त्यात सामील झाल्या होत्या. रँग्लर परांजपे शिक्षणमंत्री होताच त्यांनी मुलांप्रमाणे मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीने देण्याचे ठरवले.

**९) मद्यपान बंदीविरुद्ध चळवळ :-** मद्यपानाची प्रथा बंद व्हावी म्हणून त्यांनी व्याख्याने दिली, निदर्शने (पिकेटिंग) केली. दारूचा व्यापार सरकारने बंद करावा असा आग्रह धरला होता. दारूमुळे सरकारचा फायदा होतो; मात्र बहुजन समाजाचा तोटा होतो हे त्यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत आकडेवारीनिशी मांडले.

**१०) एन्फ्लुएंझा साथीच्या वेळी मदत :-** मुंबई-पुण्यात इ.स.१९१८ मध्ये या रोगाची साथ आली. गरीब लोकांना या साथीची लागण होऊ नये म्हणून औषध वाटप केले. मृत व्यक्तीची प्रेते जाळण्याच्या कामी त्यांनी मदत केली.

**११) इ.स. १९०३ मध्ये** बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना दिवाणपद देऊ केले होते; पण ते त्यांनी नाकारले व पददलितांची सेवा केली. प्रार्थना समाजाचे कार्य केले.

**१२) पुणे पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह -** दि. १३ ऑक्टोबर १९३० हा सत्याग्रह रोजी सुरू झाला. या सत्याग्रहात वि.रा. शिंदे सक्रिय होते. ज्यांना मानवी हक्क पाहिजेत त्यांनी इतर समाजाला मानवी हक्क दिले पाहिजेत ही त्यांची भूमिका होती.

**१३)** वि.रा. शिंदे यांना जातीचे मोठेपण मान्य नव्हते. ते अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन राहिले. पण मराठा समाज त्यांना 'महार' संबोधित असे.

इ.स. १९२० मध्ये मुंबई कायदे कौन्सिलची निवडणूक लढवली; पण जातीसाठी स्वतंत्र असलेल्या मतदारसंघातून नव्हे तर सर्वसाधारण मतदारसंघातून.

**१४) बहुजन पक्षाची स्थापना (इ.स. १९२०) :-** या पक्षाची स्थापना म्हणजे वर्गजाणिवांचा पहिला राजकीय आविष्कार होय, असे मत डॉ. सदानंद मोरे मांडतात. (सकाळ - १५ ऑगस्ट २०१६) हा पक्ष मार्क्सच्या विचारांवरच आधारित होता. पक्षाची स्थापना म्हणजे वर्गाधिष्ठित राजकारणाचा प्रारंभ होय. पण दुर्दैवाने या पक्षाचा मुळीच प्रभाव पडला नाही. वि. रा. शिंदे म्हणत समाजात पुढील दोन वर्ग असतात.

१) विद्याबल, द्रव्यबल व अधिकार बलाने पुढारलेला वर्ग.

२) वरीलपैकी कोणतेही बल नसलेला वर्ग म्हणजे बहुजन समाज या दुसऱ्या वर्गात अगदी तिरस्कृत अशा अस्पृश्य वर्गाचा अंतर्भाव होतो. या पक्षात छोटा दुकानदार ब्राह्मण असला तरी बसू शकत होता. पण मराठा जमीनदारांसाठी हा पक्ष सोयीचा नव्हता. याच समाजाच्या हितासाठी त्यांनी हा स्वतंत्र पक्ष काढला होता. या पक्षातर्फे -

इ.स.१९२० मध्ये त्यांनी पुणे सर्वसाधारण मतदारसंघातून निवडणूक लढवली पण ते अपयशी ठरले. या पक्षाचा मुळीच प्रभाव महाराष्ट्रावर पडला नाही.

वि. रा. शिंदे यांनी काढलेल्या बहुजन पक्षात पुढील वर्ग मोडत होते. १) शेतकरी वर्ग, २) शिपाई वर्ग, ३) शिक्षक वर्ग, ४) व्यावसायिक वर्ग, ५) दुकानदार, ६) मजुर वर्ग, ७) अस्पृश्य वर्ग ज्यांच्याजवळ पैसे, विद्या, अधिकार नाही अशांचा बहुजन पक्ष आहे असे ते म्हणत. आपला पक्ष विधानाचा नाही, वत्त्यांचा नाही, आरक्षणाचा नाही असा खुलासा त्यांनी केला होता.

**१५)** क्षात्र जगद्गुरुपीठ स्थापन करण्याच्या शाहू महाराजांच्या निर्णयास त्यांनी विरोध केला व शाहू महाराजांचा रोष ओढून घेतला.

**All India Depressed Class Mission ची स्थापना :-**

१६ ऑक्टोबर १९०६ रोजी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी वि.रा. शिंदे यांनी ही संस्था स्थापन केली होती. अस्पृश्यता निवरणासाठी संस्थात्मक प्रयत्नांचा पाया त्यांनीच घातला.

**संस्थेचे हेतू :-**

१) शिक्षण प्रसार करणे. (अस्पृश्यांचे शिक्षण हे त्यांचे जीवनध्येय बनले पाहिजे असे मत अहमदनगर येथील एका सभेत त्यांनी मांडले होते.)

२) नोकऱ्या मिळवून देणे.

३) सार्वजनिक अडचणींचे निवारण करणे.

४) अस्पृश्यांची वसतिगृहे चालवणे.

५) सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील व नागरिकता या गुणांचा प्रसार करणे.

**मुंबई, मद्रास, मध्य प्रदेश या प्रांतात शिंदेंचे कार्य :-**

१) ४ फेब्रुवारी १९०९ रोजी अस्पृश्य मुलांसाठी वसतिगृह उघडले.

२) मोफत दवाखाना (इ.स.१९०६-१९०८) काढला.

३) शाळा काढल्या - मुंबई शाखेने ८ शाळा काढल्या. मोफत शिवणकामाचे वर्ग.

४) निराश्रित सेवासदन, शिक्षणाची अभिरुची वाढावी म्हणून या सदनातील स्त्री प्रचारक घरोघरी जात. बाळंत स्त्रियांची शुश्रूषा करत.

५) सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर विद्वत्तापूर्ण, व्यासंगपूर्ण व्याख्याने.

६) यवतमाळ येथे अस्पृश्यांसाठी एक बोर्डिंग काढले होते.

७) पुणे येथे अहिल्याश्रमाची इमारत बांधली.

८) कर्नाटकात हुबळी, बेळगाव विजापूर व गोकाक येथे AIDCM च्या शाखा काढण्यात वि. रा. शिंदे यांचा पुढाकार होता. तसेच त्यांनी भंडारा, बालाघाट, जबलपूर, रायपूर, बिलासपूर व उत्तर भारतातील सागर आदी ठिकाणी व्याख्याने दिली व मिशनच्या कार्यासाठी ४००० रु. मदत मिळवली होती. पुणे नगरपालिकेने ७ एकर जागा मोफत दिली होती. इंदोरच्या तुकोजी होळकरांनी २०,००० रु. देणगी दिली. मुंबई सरकारचे सहकार्य त्यांना लाभले. परिणामी ही संस्था नावारूपास आली. तिचे व्यवस्थापन अस्पृश्य मंडळींच्या हाती देऊन त्यांनी एक आदर्शच समाजापुढे ठेवला.

९) प्रौढ, कुमारी व विधवा यांच्यासाठी शिवणकामाचे वर्ग सुरू केले.

**१०) औद्योगिक प्रशिक्षणाची व्यवस्था** - बुक बाईंडिंग, हातमागावर कपडा विणणे.

वि.रा. शिंदे हे अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे संशोधन करणारे पहिले संशोधक म्हणून ओळखले जातात. १९३३ मध्ये त्यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा पहिला ग्रंथ लिहिला. वि.रा. शिंदे यांच्या विचारांचा प्रभाव डॉ. आंबेडकर यांच्या संशोधनावरही पडलेला दिसतो.

**मा. प. मंगुडकर यांच्या मते,** 'अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी संस्थात्मक प्रयत्न करणारी ती पहिली व एकमेव संस्था होय.'

**डॉ. वि.वि. कोलते यांच्या मते,** 'म. फुले यांनी प्रथम अस्पृश्यांच्या घरात जी ज्ञानाची ज्योत पेटवली ती आपल्या हातात घेऊन केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात ज्ञानाचे दिवे लावण्याचे महान कार्य वि.रा. शिंदे यांनी केले.'

**वि.रा. शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या संशोधनात्मक ग्रंथात पुढील निष्कर्ष काढले होते :-**

१) अस्पृश्यता ही आर्यपूर्व संस्कृतीतून आली असावी.

२) अस्पृश्य जुन्या काळचे राजे आहेत. अस्पृश्य वर्ग मुळातच उन्नत, सुसंस्कृत व पराक्रमी असला पाहिजे.

३) अस्पृश्य धर्माने बौद्ध होते हे सांगताना त्यांनी अस्पृश्य समाजातील काही लोकगीतांचा आधार दिला आहे.

४) भारतीय संस्कृती म्हणजे आर्य संस्कृती हे चुकीचे आहे. भारतीय लोकांची कुलदैवते व ग्रामदैवते आर्यपूर्व संस्कृतीमधील आहेत.

५) आजच्या प्रादेशिक भाषांचे मूळ संस्कृतपूर्व भाषेत शोधले पाहिजे.

६) अस्पृश्यतेचा विकास कसा झाला हे सांगताना अस्पृश्यता ही बौद्ध काळातच दिसू लागली. श्रीकृष्णाच्या काळात आर्य व आर्येतर यांच्यात लग्ने होत होती हे त्यांनी पुराव्यानिशी मांडले व त्यासंदर्भात श्रीकृष्ण व जांबुवंती यांच्या विवाहाचा उल्लेख केला. तसेच भीम व हिडिंबा यांच्याही विवाहाचा ते उल्लेख करतात.

७) महाराष्ट्राची मूळची वसाहत महार व मांग समाजाची असावी.

२०) दामोदर नारायण पटवर्धन - इ.स. १९१२-२९ या काळात पुणे येथील AIDCM मध्ये कार्य केले. त्यांनी वि. रा. शिंदे यांचा उल्लेख 'अस्पृश्यनिवारकाचे गुरू' या शब्दांत केला आहे.

२१) डॉ. संतुजी रामचंद्र लाड AIDCM च्या आद्य संस्थापकांपैकी एक होते. मिशनच्या परळ (मुंबई) येथील दवाखान्यात त्यांनी रुग्णांची सेवा केली.

**All India Depressed Class Mission (AIDCM) च्या परिषदा :-**

| | | |
|---|---|---|
| इ.स.१९०७ | - | सुरत |
| इ.स.१९०८ | - | चेन्नई |
| इ.स.१९०९ | - | लाहोर |
| इ.स.१९१० | - | अहमदनगर |
| ५,६,७ ऑक्टोबर १९१२ | - | पुणे, डॉ. भांडारकर अध्यक्ष |
| इ.स.१९१३ | - | कराची, लाला लजपतराय हे कराची येथील अधिवेशनाचे अध्यक्ष होते. |
| २३ मार्च १९१८ | - | मुंबई, ५०० ते ७००० लोकांची उपस्थिती, सयाजीराव गायकवाड अध्यक्ष |
| इ.स.१९१७ | - | कोलकाता, ॲनी बेझंट (अध्यक्ष) याच काँग्रेसच्या अधिवेशनात सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये असा ठराव पास केला. |
| इ.स.१९२० | - | नागपूर येथे अ.भा. अस्पृश्यता निवारण परिषद भरली. गांधी व त्यांचे घनिष्ठ संबंध होते. AIDCM या संस्थेतील एक अस्पृश्य मुलगी गांधीजींनी दत्तक घेतली. या परिषदेला मोतीलाल नेहरू, पटेल, जमनालाल बजाज, सरोजिनी नायडू, राजगोपालाचारी हजर होते. म. गांधींचे सभेत भाषण झाले. लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखालील 'मतदान कमिटी'त सरकारने वि. रा. शिंदे व आंबेडकर यांची निवड केली होती. |

**अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघास वि.रा. शिंदेंचा विरोध :-** अस्पृश्यांनी भारतीय समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडू नये असे त्यांनी वारंवार सांगितले. इ.स.१९३२ मध्ये आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली तेव्हा अस्पृश्यांचा स्पृश्य समाजाशी उरलेला संबंध तुटेल म्हणून त्या मागणीला त्यांनी विरोध केला. स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव मतदारसंघाचा त्यांनी पुरस्कार केला.

**२३, २४ मार्च १९१८ ची अस्पृश्यता निवारक परिषद** :- मुंबई येथे भरली. न्या. चंदावरकर हे स्वागताध्यक्ष होते. सयाजीराव गायकवाड हे अध्यक्ष होते. ६००० लोकांची उपस्थिती होती.

बॅ. जयकर, केळकर, खापर्डे, भुलाभाई देसाई, बिपिनचंद्र पाल, टिळक आदी नेत्यांनी यात भाग घेतला. या परिषदेस म. गांधी, राजर्षी शाहू यांनी तार पाठवून पाठिंबा दिला होता. शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी हे हजर राहिले नाहीत. दुसऱ्या पीठाच्या शंकराचार्यांनी तार पाठवून वि. रा. शिंदेंचा निषेध केला होता. **टिळकांनी तर 'अस्पृश्यता जर परमेश्वरालाही मान्य असेल तर मी परमेश्वराचे अस्तित्व मानणार नाही' असे म्हटले होते.** या परिषदेत शाळा, पाणवठे, देवळे, सार्वजनिक इमारती, कल्याणकेंद्रे आदी ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये असा ठराव केला.

टिळकांनी परिषदेत भाषण केले. पण परिषदेनंतर हिंदुस्थानातील ३०० व्यक्तींनी अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा तयार केला होता. त्यावर 'मी वैयक्तिक जीवनात अस्पृश्यता पाळणार नाही' अशी हमी दिली होती. त्यावर स्वाक्षरी करायच्या होत्या. पण टिळकांनी स्वाक्षरी करण्याचे टाळले. 'केसरी' पत्राने टिळकांचे तेथील सभेतील भाषणसुद्धा छापले नाही हे विशेष होय. टिळकांचे अस्पृश्य व निम्नवर्गाबाबतचे मत स्पष्ट नाही म्हणून ते परिपूर्ण पुढारी नाहीत अशी टीका वि. रा. शिंदेंनी केली.

**बाबूराव सोहोनी यांच्या मते,** 'अस्पृश्यता निवारणाला फुले यांनी सुरुवात केली होती. पण मोठ्या प्रमाणावर व्यवस्थित प्रयत्न वि.रा. शिंदेंनी केले. अस्पृश्यांच्या प्रश्नाला त्यांनी राष्ट्रीय मान्यता मिळवून दिली.'

**शेतकऱ्यांच्या चळवळी व वि. रा. शिंदे :-**

**१) शेतसारा वाढीला विरोध :-** शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले, दारिद्र्य वाढले. त्यामुळे शेतसारा वाढवू नये असे आवाहन त्यांनी ब्रिटिश सरकारला केले.

**२) शेतीमालाला योग्य किंमत मिळाली पाहिजे :-** व्यापारी कमी किमतीत शेतकऱ्यांचा माल खरेदी करतात. यावर सरकारी नियंत्रण आवश्यक आहे. सरकारने योग्य किंमत शेतीमालास द्यावी.

**३) तुकडेबंदी विधेयक विरोध :-** ८ ऑक्टोबर १९२७ रोजी मुंबई कायदे मंडळात Small Holding Bill हे चर्चेसाठी आले होते. या बिलानुसार छोट्या शेतकऱ्यांकडील जमिनीचे तुकडे मोठ्या शेतकऱ्यांच्या जमिनीत जोडले जाणार होते व त्याच्या मोबदल्यात छोट्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार होती. त्यावर त्यांनी टीका केली. त्यामुळे शेतमजुरांची संख्या वाढेल, दारिद्र्य वाढेल, असंतोष वाढेल असे त्यांचे म्हणणे होते. विधेयकाविरुद्ध वि.रा. शिंदे यांनी महाराष्ट्रभर रान पेटवले होते.

**४) शेतकरी कोणास म्हणावे?** 'जो अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष जमिनीवर अवलंबून असतो, एखादी जमीन ताब्यात असते व तिची स्वतः मशागत करून उत्पन्न काढतो तोच

शेतकरी, इतर कोणीही नव्हे.' अशी व्याख्या शिंदे करतात. शेती न करणाऱ्या व्यक्तीच्या ताब्यात जमिनीची मालकी याचे त्यांना दु:ख वाटे.

जमीनदारांच्या व सरकारी मालकीच्या जमिनीचे लहान लहान तुकडे करून ते भूमिहीन शेतकरी व अस्पृश्यांना द्यावेत असे आग्रहपूर्वक ते सांगत.

शेतकऱ्यांनी संघटित व्हावे व राजकारणाचा ताबा मिळवावा असे ते म्हणत.

**भांडवलशाहीला विरोध :-** शेतकऱ्यांनी भांडवलशाहीच्या व सरकारच्या विरोधात संघटना उभी करावी असे ते म्हणत. ही संघटना उभी करताना काँग्रेसवर अवलंबून राहू नये. कारण आजची काँग्रेस हे उद्याचे पार्लमेंट आहे. कोणतेही सरकार हे भांडवलधार्जिणे असते असे ते म्हणत. शेतकऱ्यांनी उत्पादनाबरोबरच अर्थकारणाकडे लक्ष द्यावे असे ते म्हणत.

**शेतकरी परिषदांतील सहभाग/आयोजन :-**

१) पुणे - (इ.स.१९२६) - अस्पृश्यांची शेतकी परिषद.

२) पुणे - इ.स.१९२८ - मुंबई इलाखा शेतकी परिषद.

३) तेरदाळ - ३ जानेवारी १९३२. येथील संस्थानी शेतकरी परिषदेत अध्यक्षपदावरून भाषण.

४) वाळवे तालुका शेतकरी परिषद - १९३१.

५) चांदवड तालुका शेतकरी परिषद - १९३२.

**पुणे येथील शेतकरी परिषद २५ व २६ जुलै १९२८ :-**

५००० शेतकरी उपस्थित होते. सर्व पक्षांची, भिन्न मतांची मंडळी उपस्थित होती. बाबुराव जेधे हे या परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेत शिंदे यांनी यशस्वीपणे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात 'शेतकरी सुखी तर जग सुखी असा उल्लेख त्यांनी केला. शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिती कशी सुधारावी याचे त्यांनी चिंतन केले होते. शेतकऱ्यांची संघटना असावी असे त्यांना वाटे. १९२४ मध्ये वि. रा. शिंदे यांनी 'कौटुंबिक उपासना मंडळ' स्थापन केले होते.

**वि. रा. शिंदे यांचे प्रार्थना समाजातील कार्य :-**

मुंबई शहराशिवाय महाराष्ट्रात पुणे, सातारा, अहमदनगर येथे, गुजरातमध्ये अहमदाबाद, बडोदा, नवसारी, सोनगड येथे, मध्य प्रदेशात इंदोर येथे प्रार्थना समाजाच्या शाखा होत्या. त्या शाखांचे वार्षिक उत्सव आठवडाभर चालत. अशा उत्सवाच्या प्रसंगी शिंदे प्रार्थना समाजाचे मूलभूत तत्त्वज्ञानं तेथे मांडत. त्यांची ही भाषणे प्रार्थना समाजाच्या कार्याला प्रेरक, उत्साहवर्धक व दिशा देणारी ठरली. १९०५ पासून वि. रा. शिंदे अहमदनगर येथील प्रार्थना समाजाला वारंवार भेटी देत. १९११ मध्ये कोल्हापूर प्रार्थना समाजाच्या कार्यक्रमात त्यांनी भाग घेतला होता. केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव वि. रा. शिंदे यांच्यावर पडला होता. त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. ते रीतसर ब्राह्मो समाजाचे अनुयायी बनले. दर रविवारी उपासनेसाठी प्रार्थना समाजात नियमाने व आवडीने ते जात असत. वि. रा. शिंदे यांच्या पुण्यातील वास्तव्यामुळे पुणे प्रार्थना समाजात नवचैतन्य आले होते.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]